MHBI080010982022

## नि.दि.दा.क्र. २८१/२०२२ मधील निशाणी क्र. ४० खालील आदेश

प्रतिवादी क्र. १ याने सदरचा अर्ज त्याच्याविरुध्द झालेला विना कैफीयत आदेश रद्द करुन मिळण्यासाठी व त्याने दाखल केलेले म्हणणे व कैफियत स्विकारण्यासाठी केलेला आहे. प्रतिवादीने सदरच्या अर्जात कथन केले आहे की, संबंधीत दस्तऐवज न मिळाल्यामुळे त्याला मुदतीत कैफीयत दाखल करता आली नाही. प्रतिवादी हा सदरचे अर्जासोबत कैफियत दाखल करीत आहे. त्यामुळे त्याच्या विरुध्द झालेला विना कैफीयत आदेश रद्द करुन सदरची कैफियत दाखल करण्याकरीता झालेला विलंब माफ करुन सदरची कैफियत दाखल करुन घेणेत यावी असे त्याने म्हटले आहे. म्हणून त्याने त्याचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास वादींनी जबाब दिलेला असून त्यामध्ये प्रतिवादीच्या अर्जातील सर्व कथन नाकारले आहे. त्यांनी पुढे कथन केले आहे की, केवळ सदरचे दाव्याचे कामकाज लांबवण्यासाठी प्रतिवादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज कायदेशीर नाही व त्यामुळे तो रद्द होण्यास पात्र आहे असे त्यांनी म्हटले आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | विना कैफीयत आदेश रद्द करणे व कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे काय ? | ..... होय |
| २. | आदेश काय ? | .... अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

## मुद्दा क्र. १ बाबत

४. मी प्रतिवादी क्र. १ तर्फे विद्वान सरकारी वकील श्री. मसकर व वादींतर्फे विद्वान वकील श्री. डक यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादी क्र. १ याला ता. २०.०७.२०२२ रोजी समन्सची बजावणी झाल्याचे दिसुन येते. त्यानंतर ता. २०.१०.२०२२ रोजी ते सदरचे प्रकरणात हजर झाले आहेत. तसेच प्रतिवादीने लेखी कैफीयत मुदतीत दाखल न केल्यामुळे त्याच्याविरुद्ध ता. २०.१०.२०२२ रोजी न्यायालयाने विनाकैफीयत दावा चालविण्याबाबत आदेश पारित केला आहे. त्यानंतर ता. २२.११.२०२२ रोजी प्रतिवादीने सदरचा अर्ज दिलेला आहे व अर्जासोबत त्याची कैफियत दिलेली आहे. सदरचे दाव्याचे कायमचे निराकरन करण्यासाठी व प्रतिवादीला त्याची बाजू मांडणेसाठी संधी देणेसाठी त्याच्या विरुध्द झालेला विना कैफीयत आदेश रद्द होणे न्यायाच्या हितार्थ आवश्यक आहे. प्रतिवादीला जर सदरची संधी देण्यात आली नाही तर त्यांना न्याय नाकारलेसारखे होईल. तसेच दोन्ही पक्षकारांचा पूर्ण पुरावा न्यायालयासमोर आला तर न्यायालयाला योग्य न्यायनिवाडा करणे सोयीचे होईल. त्यामुळे प्रतिवादीविरुध्द झालेला विना कैफीयत आदेश

रद्द करणे व कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

## मुद्दा क्र. २ बाबत

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. २ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

सदरचा निशाणी क्र. ४० चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

SOPAN D GHANWAT

Digitally signed by SOPAN D GHANWAT
Date: 2022.11.22 13:12:53 +0530

दिनांक : २२/११/२०२२

(सो. द. घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माजलगाव.

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री. हनुमंत बळवंतराव सूर्यवंशी |
| कोर्टाचे नाव | – | दि. न्या. व. स्तर, माजलगाव |
| न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दिनांक | – | २२/११/२०२२ |
| न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दिनांक | – | २२/११/२०२२ |
| न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक | – | २२/११/२०२२ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | २२/११/२०२२ |

स्वाक्षरीत/–

दिनांक – २२/११/२०२२

(ह. ब. सूर्यवंशी)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय व. स्तर, माजलगाव